# स्वातंत्र्याचा व्यापक नवसंदर्भ मांडा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन




कोल्हापूर : राहुल फुटाणे यांना ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी व्ही. पी. निकम-पाटील, प्राजक्त पाटील, डॉ. एस. एन. पवार, डॉ. यशवंत पाटणे, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी दीडशे वर्षे लढलो. मात्र पारतंत्र्यातील गोष्टी आज आपण करीत आहोत, ही गोष्ट शैक्षणिक विकासासाठी घातक आहे. स्वातंत्र्याचा व्यापक नवसंदर्भ विद्यार्थ्यांसमोर मांडण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त कुमार भवन, कडगावचे उपक्रमशील शिक्षक राहुल कृष्णात फुटाणे यांचा ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते म्हणाले, ताराराणी विद्यापीठ शैक्षणिक संकुलात सात हजार मुली शिक्षण घेतात. हे राज्यातील एकमेव उदाहरण असेल. डॉ. व्ही. टी. पाटील यांनी शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार अंमलात आणून मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था केली. त्यामुळे कोल्हापूरच्या जडण-घडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे.

संस्थेचे सचिव व प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. तेजस्विनी मुडेकर प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन पी. आर. मंडलिक यांनी केले. आभार प्रा. जयसिंग सावंत यांनी मानले. यावेळी व्ही. पी. निकम-पाटील, प्राजक्त पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, साताऱ्याच्या कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी 'डॉ. व्ही. टी.पाटील व्यक्ती आणि कार्य' या विषयावर व्याख्यान दिले. ते म्हणाले, बहुजनांच्या उद्धारासाठी झिजलेले डॉ. पाटील माणसातील देव होते. दाभोलकर, पानसरे यांच्या हत्या हे पुरोगामी विचारांच्या वंशवेलीवरचे हल्ले आहेत. सध्याच्या विचित्र वास्तवात राजर्षी शाहूंची वैचारिक वंशवेल जपणे ती वाढविणे काळाची गरज बनली आहे.

Scanned by CamScanner